**वादीतर्फे सा. क्र. १ चा अतिरिक्त सरतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील–**

**१२.** आता मला सदर दावा चालविण्याबाबत इतर वादींनी करुन दिलेल्या वटमुखत्यारपत्राची मूळ प्रत दाखवली, तिला **नि. क्र. ११३** देण्यात येतो. आता मला दावा मिळकतीच्या महसूल नोंदीचे सातबारा उतारे दाखविले, त्यांना अनुक्रमे **नि. क्र. ११४ ते १२५** देण्यात येतात. आता मला दि. ०४.०४.१९६० च्या विक्रीपत्राची आणि मान्यतापत्राची तीस वर्षे जुन्या असलेल्या मूळ प्रती दाखविल्या, त्यांना अनुक्रमे **नि. क्र. १२६ व १२७** देण्यात येतात.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र. ३ व ४ तर्फे उलटतपास – श्री. एस. आर. पोवार वकील–**

**१३.** माझे सन १९७४ साली मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण झाले आहे. त्यानंतर मी पाटबंधारे विभागामध्ये सन १९८२ ते २०१४ पर्यंत लिपिक म्हणून काम केले आहे. मी दाव्यात प्रतिवादींनी दाखल केलेल्या कागदपत्रांची माहिती घेतलेली आहे. हा दावा रामचंद्र देसाई यांनी वादी क्र. १ व २ साठी दाखल केला होता. तो आज रोजी हयात आहे. या दाव्यामध्ये वादींनी रामचंद्र देसाई याला दिलेले वटमुखत्यारपत्र हजर केलेले असून मी ते पाहिलेले आहे.

**१४.** वादी क्र. १ व २ यांचे रामचंद्र देसाई सोबत नातेसंबंध नाहीत. मला वादींनी रामचंद्र देसाईला दिलेले वटमुखत्यारपत्र नोटीस देऊन रद्द केल्याबाबतची माहिती नाही. मी माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल करण्यापुर्वी दावा पाहिलेला आहे. मी त्यानंतर वादी व रामचंद्र यांना त्यांच्यामधील वटमुखत्यारपत्रा बाबत विचारले होते. मला वादींनी रामचंद्र देसाई याला दिलेले वटमुखत्यारपत्र रद्द केल्याचे सांगितले होते. त्यांनी मला त्याबाबतचा लेखी पुरावा दाखविला नव्हता. मी त्याबाबत रामचंद्रला विचारले नव्हते.

**१५.** माझे वटमुखत्यारपत्र या दाव्यामध्ये दि. २०.०८.२०१९ रोजी दाखल केलेले आहे. वादी क्र. १ सध्या मुंबई येथे राहत असून तिचा पती बारा वर्षांपुर्वी वारला आहे. तिचा पती मुंबई येथेच नोकरी करीत होता. ती काही दिवस नरेवाडी, ता. गडहिंग्लज या गावी येऊन–जाऊन राहत होती. वादी क्र. २ ही वादी क्र. १ ची आई असून तिच्यासोबत राहते. वादी क्र. २ चा पती सन २०१२ मध्ये मयत झाला आहे. वादी क्र. १ व २ आणि मयत शंकर देसाई माझे नातेवाईक नाहीत.

**१६.** या दाव्याचा क्र. ८८/२०१३ आहे. मला वादींनी या दाव्या व्यतिरिक्त इतर दावे चालविण्याबाबत वटमुखत्यारपत्र दिलेले नाही. माझ्या वटमुखत्यारपत्रामध्ये दि. दावा ८८/२०१३ चे

काम चालविण्या बाबतचा उल्लेख केलेला नाही. माझ्या वटमुखत्यारपत्रामध्ये रे.क.नं. ९२/२०१० चालविण्या बाबत उल्लेख केलेला आहे. मला शंकर देसाई ने या न्यायालयात प्रतिवादींच्या विरोधात दावा मिळकती बाबत दाखल केलेल्या दि. दावा क्र. ९२/२०१० ची माहिती आहे. मी त्या दाव्यामध्ये वटमुखत्यारपत्र हजर करुन त्याचे काम पाहिलेले नाही. मला तो दावा शंकर देसाई मयत झाल्यामुळे रद्द झाल्या बाबतची तोंडी माहिती आहे. मला तो कोणत्या साली रद्द झाला याबाबत माहिती नाही.

**१७.** मी ९२/२०१० चा दावा वाचून पाहिलेला नाही. दावा मिळकतींना पुर्वी अनुक्रमे १३७/१ व १३७/२ असे सर्वे क्रमांक होते. वादी क्र. २ बोलू शकते, वादी क्र. १ चालू व बोलू शकते. माझे वटमुखत्यारपत्र गडहिंग्लज येथे केले आहे. त्यासाठी वादी गडहिंग्लज येथे आल्या होत्या. त्या मुंबई वरुन ४५० कि.मी. अंतर पार करुन आल्या होत्या. गडहिंग्लज ते आजरा अंतर २२ कि.मी. आहे. नरेवाडी ते आजरा हे अंतर ३० कि.मी. आहे. माझे वटमुखत्यारपत्र रमेश लोहार याने तयार केले आहे. मला वादी व रमेशची पुर्वीची ओळख असल्याची माहिती नाही. माझी व रमेशची पुर्वीची ओळख नव्हती. वादींनी चौकशी केल्याप्रमाणे आम्ही रमेश लोहार याच्याकडे वटमुखत्यारपत्र करण्यासाठी गेलो होतो.

**१८.** मला रमेश लोहारची स्वाक्षरी ओळखता येते. वटमुखत्यार पत्रावरती रमेश पाटील या व्यक्तीची स्वाक्षरी आहे. वादींनी रमेश लोहारला वटमुखत्यारपत्र करण्याबाबत तोंडी माहिती दिली होती. वादी दाव्याबाबत स्वतः येऊन माहिती देऊ शकत नाही. वादींना चालता येऊ शकत नसून त्या मुंबईला राहत असल्यामुळे त्यांना दाव्याकामी नियमित हजर राहणे शक्य नसल्यामुळे मला वटमुखत्यारपत्र दिले आहे. वादींनी त्यांना चालता येत नसल्यामुळे दाव्याचे काम पाहण्याबाबत वटमुखत्यार पत्रामध्ये विशेषतः नमूद केलेले नाही. मी या दाव्यात वटमुखत्यार म्हणून फराकटे वकिलांचे वकीलपत्र स्वाक्षरी करुन दिले आहे. मी वादींना चालता येऊ शकत नसल्याचा वैद्यकीय पुरावा दाखल करु शकतो.

(न्यायालयाची वेळ संपल्यामुळे उलट तपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.)

**उलटतपास अपुर्ण.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RAVI PANDURANG THORE
Date: 2024.07.09 17:25:21 +0530

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०९.०७.२०२४. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.